**(महानगरपालिकेच्या हददीमध्ये बांधकाम हाती घेणा-या कंत्राटदाराकरीता LBT भरणेचे पर्यायाबाबत सादर करावयाचे रुपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज)**

**प्रतिज्ञापत्र**

**(पहा नियम-२७(५))**

मी श्री/श्रीम.........................................................................................................
वय...........वर्षे...........रा.............................................................................................
..................................................................................सत्य प्रतिज्ञेवर मी ....................
.........................................................................................या व्यवसायाचा मालक/ फर्मचा प्रोप्रायटर/ भागीदार म्हणून प्रतिज्ञापत्र करुन देतो की,

1.मी/आम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभाग/ व्यवसायाचा मालक/ व्यापा-याचे नांव/फर्मचे नांव ......... ............... ............................... यांचे करीता ................................................. ............ कामासाठी व्यापारी/कंत्राटदार म्हणून महापालिका/व्यावसायिका बरोबर करारनामा केलेला आहे.

2. मी/आम्ही आमचे फर्मची स्थानिक संस्था करासाठी नोंदणी केली असून, त्याचा LBT No. .......................................................... असा आहे.

3. महाराष्ट्र महानगरपालिका(स्थानिक संस्था कर) नियम, 2010 मधील नियम 27(5) मधील तरतूदीनुसार वरील नमूद कामाकरिता आम्ही जो माल आयात करणार आहोत. अशा मालावर स्थानिक संस्था कर भरणा करणेकामी खालील पर्याय आहेत.

**अ)** उपरोक्त (1) मध्ये नमूद कामांसाठी/कंत्राटासाठी शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर स्थानिक संस्था कर प्रदान करणे.

**ब)** उपरोक्त (1) मध्ये नमूद कामांसाठी/कंत्राटासाठी कंत्राट मूल्याच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कराचे ठोक प्रदान करणे.

वरील पर्यायांपैकी स्थानिक संस्था कर भरणेकामी आम्ही पर्याय अ.क्र.--------चा स्वीकारत आहोत. सदर पर्यायानुसार LBT आम्ही भरणार असून आवश्यकतेवेळी त्याबाबतची सर्व कागदपत्रे, चलने, बीले, रजिस्टर इ. उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आमची राहणार आहे याची आम्हाला जाणीव करुन देणेत आलेली आहे.

4. -----------------------------------------------------------------------------------------------------------

[ आम्ही अ.क्र. 3अ नुसार शहराच्या हद्दीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर स्थानिक संस्था कर प्रदान करणे.
हा पर्याय स्वीकारला असल्यामुळे काम पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी जो माल आयात केला जाईल त्यावरील स्थानिक संस्था कर वेळोवेळी भरणेची जबाबदारी आमची राहील.]

[आम्ही अ.क्र. 3ब नुसार कंत्राट मूल्याच्या एकूण रक्कमेच्या 0.25% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कराचे ठोक प्रदान करणे. हा पर्याय स्वीकारला असलेमुळे करारनाम्यानुसार कंत्राटमूल्य एकूण र.रु. -------------- आहे त्यानुसार स्थानिक संस्था कराची एकूण रक्कम-------------------होते. सदर रक्कम रु. -------------------- भरलेचा पुरावा सोबत सादर केला आहे. ]

**(वरीलपैकी जो पर्याय निवडला असेल फक्त तो नमूद करावा.)**

5. स्थानिक संस्था कराची रक्कम भरणे संबंधात तफावत/चूक निदर्शनास आल्यास स्थानिक संस्था कर नियमातील तरतूदीनुसार स्थानिक संस्था कर व शास्तीच्या रकमा भरणेस मी पात्र असेन.

वरील प्रमाणे स्थानिक संस्था करासाठी मी सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र करुन दिले असे.

ठिकाण

फोटो

दिनांक

प्रतिज्ञापत्र करुन देणार

नाव

पता

ई-मेल

**वाचले** – महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
स्थानिक संस्था कर विभाग
क्र.स्थासंक/५/ कावि/१४६/२०१४
दिनांक २७/१/२०१४

**विषय :- महानगरपालिका शहराबाहेरुन आयात करत असलेल्या मालाचे स्थानिक संस्था कराबाबत**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक ०१ एप्रिल २०१३ पासून जकात करा ऐवजी स्थानिक संस्था कर लागू झाला आहे. शहराबाहेरुन उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीत प्रवेश होणा-या मालावर स्थानिक संस्था कर लागू होतो. स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील तरतूदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका जो माल हद्दीबाहेरुन आयात करत असेल अशा मालावर स्थानिक संस्था कराची वसूली होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत विकासाची कामे निविदा काढून कंत्राटदारामार्फत केली जातात तसेच कार्यालयीन कामकाजासाठी लागणारे साहित्य/माल/स्टेशनरी/वस्तू थेट पध्दतीने किंवा कंत्राटदारामार्फत शहराबाहेरुन खरेदी केली जाते. स्थानिक संस्था कर नियमातील तरतूदीनुसार अशा मालावरील स्थानिक संस्था कर वसूलीकामी सर्व संबधितांनी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१) **महानगरपालिका कंत्राटदारामार्फत करत असलेल्या कामाबाबत -** स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील नियम २७(५) तरतूदीनुसार महानगरपालिकेच्या क्षेत्रात काम हाती घेणा-या कोणत्याही व्यापारी किंवा व्यक्तीला अशी कामे हाती घेण्यासाठी शहराच्या हददीत आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर एकतर स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा किंवा त्याच्या कंत्राट मूल्याच्या ०.२५% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा पर्याय दिलेला आहे. सदर तरतूदीचे अनुषंगाने महापालिकेच्या विविध विभागामार्फत कंत्राटदाराकडून जी कामे करणेत येतील अशा कंत्राटदाराकडून सोबतच्या नमुन्यातील स्थानिक संस्था कर भरण्याच्या पर्यायाचे प्रतिज्ञापत्र भरुन घ्यावे. तसेच करारनाम्यात LBT नोंदणी करणे व LBT भरण्याचे दायित्वाची अट नमुद करावी. कंत्राटदारास कामाचा आदेश निर्गत करताना त्यामध्ये खालील अटी/शर्तींचा समावेश करावा. कामाचे आदेशाची एक प्रत LBT विभागास पाठवावी.

अ) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियम 27(5) च्या तरतूदीनुसार सोबतचे प्रतिज्ञापत्र नमुन्यातील अ.क्रं 3 (अ) प्रमाणे वेळोवेळी आयात होणा-या मालावर LBT भरण्याचा पर्याय निवडला असेल तर अशा प्रकरणी कामाचे अंतिम

टप्प्याचे बील अदा करण्यापूर्वी आयात केलेल्या मालावर संपूर्ण LBT भरलेची व सदर LBT रक्कम स्थानिक संस्था कर या लेखाशिर्षावर जमा झालेबाबत खातरजमा करावी. तसेच कामाच्या आदेशामध्ये खालील अटी/शर्ती नमूद कराव्यात.

**अटी/शर्ती**

1) आयात केलेल्या मालाच्या किंमतीवर स्थानिक संस्था कर नोंदणी क्रं PCMC-LBT---------- वर स्थानिक संस्था कराचे दरपत्रकातील Shedule 'A' मधील दरानुसार स्थानिक संस्था कर विहीत मुदतीत भरणे बंधनकारक राहील. रक्कम भरताना त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास सदर त्रुटींची पूर्तता करणेची जबाबदारी संबंधितांवर राहील.
2) कंत्राटीचे काम चालू केलेचे तारखे पासून 03 दिवसाचे आत स्थानिक संस्था कर विभागास लेखी स्वरुपात कळविणे बंधनकारक राहील. तसेच स्थानिक संस्था कर विभागाने मागणी केल्यास आवश्यक ते लेखे व कागदपत्रे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी संबंधितांवर राहील.
3) स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 29 नुसार वार्षिक विवरणपत्र नमुना "ड-2" मध्ये सादर करणे बंधनकारक राहील.
4) मूळ करारनाम्यात सुधारणा/बदल झालेस त्यानुसार LBT भरणे बंधनकारक राहील.
5) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 व त्यामध्ये वेळोवेळी होणा-या सुधारणा लागू राहतील.

ब) नियम 27(5) च्या तरतूदीनुसार सोबतच्या प्रतिज्ञापत्र नमुन्यातील अ.क्रं 3 (ब) प्रमाणे कंत्राटदाराने कंत्राट मूल्याच्या ०.२५% इतक्या ठोक दराने स्थानिक संस्था कर प्रदान करण्याचा पर्याय निवडला असेल तर स्थानिक संस्था कर रक्कम भरलेची चलन / पावती घेवून कामाचा आदेश देणेची कार्यवाही करावी. तसेच कामाच्या आदेशामध्ये खालील अटी/शर्ती नमूद कराव्यात.

**अटी/शर्ती**

1) ठोक प्रदानाने भरणा केलेली स्थानिक संस्था कराचे रक्कमेत तफावत/त्रुटी आढळून आलेस सदर त्रुटींची पूर्तता करणेची जबाबदारी संबंधितांवर राहील.
2) स्थानिक संस्था कर नियम 2010 मधील नियम 29 नुसार वार्षिक विवरणपत्र नमुना "ड-2" मध्ये सादर करणे बंधनकारक राहील.
3) मूळ करारनाम्यात सुधारणा/बदल झालेस त्यानुसार LBT भरणे बंधनकारक राहील.
4) महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 व त्यामध्ये वेळोवेळी होणा-या सुधारणा लागू राहतील.

**२) महानगरपालिकेचे विविध विभागामार्फत स्वत: शहराबाहेरुन माल / स्टेशनरी / साहित्य आयात करत असल्यास –** जो विभाग शहराबाहेरुन माल / स्टेशनरी / साहित्य आयात करील अशा विभागाने महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर नोंदणी क्रमांक PCMC-LBT-No-0008758 या

क्रमांकावर आयात केलेल्या मालावर स्थानिक संस्था कराचे दरपत्रकातील Shedule 'A' मधील दरानुसार स्थानिक संस्था कराची रक्कम भरणेची कार्यवाही करावी.

३) **बीले अदायगी व अनुषंगीक कार्यवाही** - लेखा विभागाने कंत्राटदार किंवा मनपाने शहराबाहेरुन आयात केलेल्या मालाचे बिलाची अदायगी करताना LBT च्या रक्कमा वसूल झाल्याची खातरजमा करुन कार्यवाही करावी. तसेच स्थानिक संस्था कर नियम २०१० मधील तरतूदीचे अनुषंगाने सर्व अनुशंगिक कार्यवाही पूर्ण करणेची दक्षता घ्यावी.

४) **स्थानिक संस्था कर दरपत्रक** - स्थानिक संस्था कराचे दरपत्रक, नियम, माहिती इ. महानगरपालिकेची वेबसाईट pcmcindia.gov.in यावर प्रसिध्द केले असून त्यानुसार शहराबाहेरुन आयात केलेल्या मालावर स्थानिक संस्था कर भरणेबाबत सर्व संबधित विभागांनी कार्यवाही करावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

**प्रत** - सर्व संबधित